ISSN 2319-5843

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education

# VISION RESEARCH JOURNAL FOR POLITICAL SCIENCE & PUBLIC ADMINISTRATION

(Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - VI, Issue - XI, Vol. I | Impact Factor 2.98 (GRIFI) | Feb. 2017 To July 2017

EDITOR IN CHIEF

DR. SARJERAO SHINDE

Issue-XI, Vol. I
VRJFPSPA
IMPACT FACTOR 2.98
ISSN 2319-5843
Feb. 2017 To July 2017

# INDEX



| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Black Money & Indian Economy | Dr. Girmaji Pagade | 1 |
| 2 | A Study of Women Empowerment in Political and Educational Sector | Dr. Govind Yemalwad | 9 |
| 3 | Consumer Protection act, its Background and Nature | Dr. V. J. Vilegave | 14 |
| 4 | पंचायतराजमधील ग्रामीण विकास एक राजकीय विश्लेषण | डॉ. एस. एस. पाटील | 20 |
| 5 | श्रीलंकेतील वांशीक संघर्षाचा राजकीय अभ्यास | डॉ. मनोहर पाटील | 27 |
| 6 | शाश्वत विकासासाठी पर्यावरणीय संरक्षण | लक्ष्मण फुलचंद शिराळे | 33 |
| 7 | भारतीय संविधान आणि धर्मनिरपेक्षता | पुष्पा विश्वनाथ महिपाल | 39 |
| 8 | महात्मा फुले यांचा समताविषयक विचार | डॉ. गिरमाजी पगडे | 45 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर - एक मुक्त चिंतन | डॉ. गोविंद यमलवाड | 51 |
| 10 | जातीयवाद आणि मानवी हक्क | डॉ. व्ही. जी. विळेगावे | 57 |
| 11 | संत गाडगेबाबा आणि ग्राम स्वच्छता अभियान | ए. के. जाधव | 62 |
| 12 | जनलोकपाल बिल एक विवेचन | डॉ. विवेक विष्णूदास जाधव | 68 |

Issue : XI, Vol. I
VRJFPSPA IMPACT FACTOR 2.98 ISSN 2319-5843
Feb. 2017 To July 2017 

11

# संत गाडगेबाबा आणि ग्राम स्वच्छता अभियान

ए. के. जाधव
लोकप्रशासन विभाग,
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय
सोनपेठ जि. परभणी (महाराष्ट्र) भारत

***Research Paper -Public Admintration***

२३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्हयातील शेणगाव या खेडेगावात संत गाडगेबाबा यांचा जन्म झाला. ते परिट जमातीत जन्मास आले असले तरी कपडे धुणे हा त्यांचा व्यवसाय नव्हता. ते व्यवसायाने शेतकरी होते. समाजातील अंधश्रध्दा, व्यसनाधिनता, अज्ञान, शिक्षणाचा अभाव, जातीयवाद इ. दोषामुळे होणारे समाजाचे नुकसान या मधून गाडगेबाबाच्या मनात आसक्ती निर्माण झाली. त्यांना स्वतःपेक्षा समाज महत्वाचा वाटू लागला. अशा परिस्थितीत त्यांनी समाज सेवेचे वृत्त अंगीकारले व जगाच्या कल्याणाकरीता त्यांनी गृहत्याग केला. संत गाडगेबाबा समाजात पसरलेल्या अंधश्रध्देवर जोरदार हल्ला चढवित होते. त्यांना असे वाटत होते की, समाजाला श्रध्दा व अंधश्रध्दा यातील फरक कळलेला नाही. त्यामुळे गाडगेबाबा आपल्या किर्तनातून समाजाला असे सांगत होते की,

'' जेथे नाही देव जागी । कारे श्रमता तेथे उगी ॥
रोगराईचे उघड कारण । अस्वच्छता मन प्रदोषण ॥''

जोपर्यंत मनातील अज्ञानाचा मळ धुतला जाणार नाही, तोपर्यंत मन स्वच्छ होणार नाही. रोगराईचे कारण देव नसून त्याचे कारण आपणच आहोत. आपण जर स्वच्छता राखली तर सर्व रोगराई दुर होतात, असा उपदेश किर्तनातून देत असत. गाडगेबाबांचे किर्तन झाले की पटकीच्या रोगाचा फेरा चुकतो असा लोकांचा समज होता. परंतु वस्तुस्थिती अशी होती की, ज्या गावात किर्तन असेल त्या गावची साफसफाई गाडगेबाबा करित होते व त्यामुळे तेथे रोगजंतूला वावच मिळत नसे.

संत गाडगेबाबांनी खराटया सारख्या एका साध्या साधनातुन समाजात दिपस्तंभ उभारण्याचे कार्य केले. समाजाला अज्ञानाकडून ज्ञानाकडे, अनारोग्यातून आरोग्याकडे, अंधश्रध्देतुन विज्ञानाकडे, विषमतेतुन समतेकडे घेऊन जाण्याचा सततत प्रयत्न केला. ''स्वच्छता ह्याच परमेश्वर '' आहे सिध्द करून दाखविण्याचे कार्य गाडगेबांबानी केले. स्वच्छता म्हणजे प्रसन्नता, पवित्रता, स्वावलंबन, प्रदुषणापासुन मुक्तता, पर्यावरणास पर्याय अशा विचारांचा कृतिशिल अविष्कार गाडगेबाबांनी घालून दिलेला होता. त्यांनी अनासक्त भावनेने झाडून स्वच्छ केलेला गाव म्हणजे श्रम संस्कृतीचा सुवर्ण कळस होता.

**उद्देश -**

सदर शोधनिबंध पुढील उद्देशाला अनूसरुन लिहिण्यात आला आहे.

१) संत गाडगेबाबांच्या जीवन कार्याचा अभ्यास करणे.

२) ग्राम स्वच्छता अभियानाच्या निर्मितीचा आढावा घेणे.

३) अभियानातील विविध उपक्रमाचा आढावा घेणे.

४) ग्राम स्वच्छता अभियान व शौचालय वापराचे महत्व जानून घेणे.

**अभ्यास पध्दती -**

प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यात संदर्भग्रंथ, दैनिक वर्तमानपत्रे, शासन निर्णय, मासिके, संकेतस्थळे, शासकीय अहवाल इ. साधनांचा अवलंब करण्यात आला आहे.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्यात येत आहे. या अभियानात शौचालये व त्याचा वापर याला अधिक महत्व देण्यात येते. या अभियानात सर्व नागरिकांनी सहभाग घेणे आवश्यक आहे. अभियानापुर्वी शौचालयाच्या वापराबाबत अनेक उलट सुलट चर्चा होती. परंतू अभियानामुळे शौचालय व त्याच्या वापरास चालना मिळाली. हे कार्य ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी योग्यरित्या करित आहेत. ग्रामीण भागात अनेक लोक उघडयावर शौचास जातात. परपंरेनुसार प्रत्येक गावाला वेगळया जागा शौचासाठी मोकळया सोडलेल्या होत्या. स्त्री पुरूष वेगवेगळया दिशांना शौचास जात असत. लोकसंख्या झपाटयाने वाढत असल्यामुळे पुर्वीची गावठाणे कमी पडत आहेत. गावाजवळची शेती शौचासाठी वापरली जायची, ती देखील आता वस्तीखाली आल्यामुळे शौचविधीचा प्रश्न गंभीर बनत आहे. पुरूष कुठेतरी लांब जावुन विधी उरकतात. महिलांची मात्र मोठी अडचण होते. शौचालयाची सुविधा नसल्यामुळे स्त्रिया दिवसा शौचास जात नाहीत. बराच काळ विष्ठा पोटात साठून राहते, त्यातील जंतु व विषाणूंचा आतडयावर

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



वाईट परिणाम होऊन पर्यायी पोटाचे विकार जडतात. विशेषत: रात्रीच्या वेळी महिला दुरवर शौचास जावु शकत नाहीत. त्यांची सुरक्षितता धोक्यात येत आहे. अस्वच्छता व दुषित पाण्यामुळे लहान मुले तात्काळ आजारी पडतात. आजारपणामुळे लहान मुले व बालकांच्या शारिरीक, बौध्दिक व मानसिक विकासात अडथळे निर्माण होतात. त्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण वाढते. यामुळे अभियानाच्या मांध्यमातून घर तेथे शौचालय ही संकल्पना उदयास आली.

संत गाडगेबाबा समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा व कर्मकांडाना समाजातून घालविणारे महान क्रांतीकारक होते. या महान पुरूषाच्या सामाजिक कार्याची दखल घेवून, त्यांची ग्रामीण समाजाबद्दलची आत्मीयता पाहून, ग्रामीण भागातील अनारोग्य, अस्वच्छता, जनतेचा जीवनविषयक खालावलेला दर्जा, पर्यावरणाचा होणारा ऱ्हास इ. बाबी लक्षात घेवून महाराष्ट्र शासनाने गाडगेबाबाच्या स्मृती जीवंत ठेवण्यासाठी, ग्रामीण स्वच्छता व आरोग्य सुधारण्यासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री कै. आर. आर. पाटील यांनी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची इ. स. २००० मध्ये सुरुवात केली. स्वच्छतेच्या बाबतीत पुरुषांपेक्षा महिला अधिक जागरूक असतात. कारण रुढी परंपरेनुसार घर, अंगण, स्वयंपाक घर, न्हानीघर, पशुचे गोठे, लहान मुलांची स्वच्छता, वयस्कर व्यक्तिंची सुश्रुशा व देखभाल इ. स्वच्छतेविषयक कामे महिलाच करित आल्या आहेत. तुंग जि. सांगली या गावातील महिलांनी गवंडी कामाचे प्रशिक्षण घेवून गावात शौचालय बांधकामे केली, इतर महिलांना प्रशिक्षित केले तसेच, पहाटे ५ वा. मशाल फेरी काढून जनजागृतीचे कार्य केले. निढळ ता.खटाव जि.सातारा येथील महिला गटाने प्रशिक्षण घेऊन इतर महिलांना त्यात सहभागी करुन घेतले.

या अभियनामध्ये ग्राम स्वच्छता व आरोग्याच्या दृष्टीने मानवी विष्ठेचे व्यवस्थापन पिण्याचे पाणी व्यवस्थापन सांडपाणी व्यवस्थापन कचरा व्यवस्थापन वैयक्तिक स्वच्छता आहार स्वच्छता लोकसहभाग प्राप्ती कुटूंब नियोजन इ. कार्ये पार पाडली जातात.

**अभियानातील महत्वाचे उपक्रम -**

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत खालील महत्वाचे उपक्रम राबविले जातात.

**१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा**

महाराष्ट्रातील ग्रामीण नागरिकांचे आरोग्यमान, जीवनमान सुधारावे, ग्राम स्वच्छतेला चालना मिळावी, प्रोत्साहन मिळावे म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या नावाने स्वच्छ ग्राम स्पर्धा सुरू केली. ज्या ग्रामपंचायती स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवतील व गाव हागणदारी मुक्त करतील त्या गावास बक्षिस दिले जाते.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



२) स्व. आबासाहेब खेडकर स्मृती पुरस्कार

प्रस्तुत अभियानांतर्गत कुटूंब कल्याण याबाबत उत्कृष्ठ कार्य करणाज्या ग्रामपंचायतीला हा पुरस्कार दिला जातो. लोकसंख्येस आळा घालणे, बाल-मृत्यूच्या प्रमाणात घट करणे, साथीच्या रोगाविषयी नागरिकांना माहिती देणे, कुपोषित बालकांचे आरोग्य वाढीस लावणे, स्त्री-पुरुषांना कुटूंबकल्यानांतर्गत दोन मुलानंतर शस्त्रीक्रियेस प्रवृत्त करणे हे या पुरस्काराचे उद्देश आहेत.

३) स्व. वसंतराव नाईक स्मृती पुरस्कार

हा पुरस्कार पिण्याचे पाणी व सांडपाणी यांच्या व्यवस्थापनाबाबत उत्कृष्ठ काम करणाज्या ग्रामपंचायतींना दिला जातो. पाणी पुरवठयाच्या सार्वजनिक स्त्रोतांचे संरक्षण, संवर्धन करणे तसेच नळाद्वारे पाणी पुरवठा करणे, पाणी पट्टीविषयी काळजी घेणे, पाण्याच्या स्त्रोतांची देखभाल व दुरुस्ती करणे, पाणी शुध्दीकरण करणे, रासायनिक तपासणी करणे इ. कार्ये या पुरस्कारांतर्गत केली जातात. शिवाय आरोग्य साथ रोग उपाय योजना व निर्मुलन, साथीचे रोग हाऊ नयेत याची काळजी त्या-त्या ग्रामपंचायतींनी घेतली आहे का? इ. कार्यासाठी हा पुरस्कार दिला जातो.

४) डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार

हा पुरस्कार गावातील सामाजिक एकतेबाबत उत्कृष्ठ काम करणाज्या ग्रामपंचायतींना दिला जातो. गावातील सर्व जाती धर्मात सलोखा, सहकार्य व एकात्मता वाढीस लावणे असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. गावात एकात्मता वाढीस लावण्याची कार्ये ग्रामपंचायती करित आहेत.

५) यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार

हा पुरस्कार ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छतेचा प्रचार-प्रसार व प्रसिध्दीचे उत्कृष्ठ काम करणाज्या पत्रकारास दिला जातो. सदरील पुरस्कार हा जिल्हा स्तरावर दिला जातो. तसेच या पुरस्कारांतर्गत गावात पोस्टर्स स्पर्धा घेणे, भिंतीवर स्वच्छता विषयक म्हणी लिहीणे, प्रशिक्षणातील माहिती ग्रामस्थांना देणे, प्रचार व प्रसिध्दीसाठी अधुनिक माध्यमांचा वापर करणे, शासनाने तयार केलेला चित्रफीती ग्रामस्थांना देखविणे इ. उपक्रम राबविणाज्या ग्रामपंचायतींनाही पुरस्कार दिला जातो.

६) साने गुरूजी स्वच्छ शाळा स्पर्धा

प्रस्तुत अभियानांतर्गत शालेय स्तरावर स्वच्छता राखण्यासाठी साने गुरुजी स्वच्छशाळा स्पर्धेअंतर्गत गावातील प्राथमिक शाळांनी स्वच्छतेसाठी प्रयत्न करणे आवश्यक असते. मुलांना स्वच्छतेच्या सवयी लावणे त्यांच्यावर स्वच्छतेचे संस्कार करणे, शाळा परिसर स्वच्छ ठेवणे, मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची निर्मिती करणे इ. या पुरस्कारामागची ध्येये आहेत. त्या-त्या स्तरावर स्पर्धेत

Late K... Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



भाग घेतलेल्या सर्वाधिक स्वच्छ शाळेला साने गुरुजी यांच्या नावाने पुरस्कार दिला जातो व शालेय स्वच्छतेला चालना दिली जाते.

**७) सावित्रीबाई फुले स्वच्छ अंगणवाडी स्पर्धा**

प्रत्येक गावात अंगणवाड्या स्थापन केलेल्या आहेत. अंगणवाड्यामध्ये लहान बालक शिक्षण घेत असतात. बालमनावर स्वच्छतेच्या संस्कार व्हावेत, त्यांना स्वच्छतेच्या सवयी लागाव्यात या हेतुने सावित्रीबाई फुले यांच्या नावाने सर्वाधिक स्वच्छ अंगणवाडीस पुरस्कार दिला जातो. ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत वरील दोन स्पर्धा आयोजित करून प्रत्येक ग्रामपंचायतीमधील शाळा व अंगणवाडी यांना तालुका, जिल्हा, विभाग व राज्य स्तरावरीयबक्षीस दिले जाते.

**८) राष्ट्रपिता म. गांधी स्वच्छ जिल्हा परिषद व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धा**

या स्पर्धेअंतर्गत जिल्हा परिषदेचे संपूर्ण कार्यक्षेत्र हागणदारीमुक्त झाल्यास शासनाकडून संबंधित जिल्हा परिषदेला २० लाख रू. चे बक्षिस दिले जाते. तसेच पंचायत समितीचे संपूर्ण कार्यक्षेत्र हागणदारीमुक्त झाल्यास संबंधित पंचायत समितीला ५ लाख रू. चे बक्षीस दिले जाते. या बक्षिसामुळे जिल्हा व तालुका हागणदारीमुक्त होण्यास मदत होत आहे. ग्रामपंचातींना प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे.

**शौचालय वापराचे फायदे**

रानटी अवस्थेत मानव वस्ती करून रहात नव्हता. त्यामुळे मलमूत्र व्यवस्थापन संकल्पनेची गरज वाटली नाही. परंतू पुढे मानव वस्तीकरून राहू लागला. लोकसंख्या भरमसाठ वाढली. खेडे, शहरे, तयार झाली तेव्हा मलमूत्र व्यवस्थापनाची लोकांना गरज वाटू लागली. यातूनच ग्रामस्वच्छता अभियानाची निर्मिती झाली. अभियानाच्या अंमलबजावणीतून मोठया प्रमाणात शौचालयाची निर्मिती होऊ शकली व अनेक गावे स्वच्छ झाली. अभियानातून शौचालय बांधकाम व वापर मोठया प्रमाणात वाढला. शौचालय वापरामुळे अनेक प्रकारचे लाभ मिळतात. हे या अभियानातून पुढे आले. साधारणपणे शौचालय वापरामुळे पुढील प्रकारचे लाभ होतात.

१) वैयक्तिक - व्यक्तीला शौचालय वापरामुळे वैयक्तिक लाभ मिळू शकतात. अनेक साथीच्या आजारापासून बचाव करता येतो. एका व्यक्तिच्या वर्षभराच्या अन्नधान्यासाठी लागणारे खत त्या व्यक्तिच्या वर्षभराच्या मलमूत्रापासून मिळते.

२) कौटूंबिक - शौचालयाच्या वापरामुळे कुटूंबातील व्यक्तींचे आजारापासून सरंक्षण होते. त्यामुळे कौटूंबिक स्वास्थ मिळते. औषधोपचार खर्च कमी होतो, आर्थिक बचत होते. मुले

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



व वृध्द, आजारी व्यक्तीं, महिलांना शौचासाठी दुर जावे लागत नाही. साप, विंचू याची भिती बाळगण्याचे कारण नाही. यामुळे पैसा व वेळ बचत होते.

३) सामाजिक - शौचालयाच्या वापरामुळे मानवी विष्ठा उघडयावर टाकली जात नाही. त्यामुळे सामाजाचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. परिसर स्वच्छता राखली जाते.

४) राष्ट्रीय - शौचालयाच्या वापरामुळे रोगराईचे प्रमाण कमी होते. त्यामुळे लाखो लोकांना रोजगारापासुन वंचित रहावे लागत नाही. शासनाकडून औषधोपचारासाठी केला जाणारा खर्च कमी होतो. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.

५) परिसर स्वच्छता - गाव परिसर स्वच्छ ठेवण्याच्या दृष्टीने लोकांचा विशेषतः तरूणांचा सहभाग अधिक लाभदायी ठरतो. तसेच स्वंयसेवी संस्था, महिला मंडळे, युवा मंडळे किंवा संघटना, शाळा यांचे प्रतिनिधी तसेच ग्रामपंचायत, पंचायत समिती यातील अधिकारी व पदाधिकारी हे परिसर स्वच्छता, आरोग्य जाणीव जागृती व देखभाल या संबंधीची कार्य प्रभावीपणे करतात.

## संदर्भ सूची

१) योजना - जुलै २००८, महाराष्ट्र शासन
२) जारे रमेश - स्वच्छतेचे धनी २००२, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई
३) सती. व्हि .पी. - पर्यावरण और प्रदूषण (Environment and Pollution) - २००७ पोईन्टर पब्लिशर्स, जयपूर
४) National sample survey Report, १९९९
५) डॉ. पदवाड बाळ - ग्रामगीता - स्वरूप आणि तत्वज्ञान २०१०, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर
६) वाघेला आनिल एस. - स्वच्छता का समाज शास्त्र २०१५, कल्पाज पब्लिकेशन, दिल्ली
७) डॉ. मापुसकर सु. वि. - हागणदारी मुक्त गाव मोहिम, २००२ यशदा, पुणे
८) www.ideasforindia.in/article.aspx?article_id=३२९ (Culture, Religion and Open defecation in Rural North India, १४ Aug. २०१४.)
९) CLRA - Centre for Legislative Research and advocacy, policy Brief for Parliamentarians Open Defecation : This is also your business !, Policy brief series : No. २०, २०१३ (Aug.-Sept.)
१०) Report No. ४४९ Drinking water, Sanitation and Hygiene in India, NSS ५४th Round (January १९७३ to Jue १९९८) July १९९९, National Sample survey Organization, Department of Stastistics, Government of India

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani